# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १८/४/२०१८

## विद्युत विभाग

## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक** ( ०२ ):- मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात एल.ई.डी. पथदीवे बसविणे बाबत धोरण निश्चित करणे.

ठराव क्रमांक ( ):-

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मे रिलायन्स एजर्जी लि. व टाटा पावर लि. या कंपनी मार्फत विज पूरवठा केला जातो. तत्पूर्वी ग्रामपंचायती अस्तित्वात असताना १९७९ च्या दरम्यान सर्व ग्रामपंयतीनी ठराव करुन मे. बी.एस.ई.एस लि. यांना मुंबई महानगरपालिकेच्या धर्तीवर मिरा भाईंदर क्षेत्रात वीज पूरवठा करण्याबाबत विनंती केल्यानूसार वीज पूरवठा सुरु आहे. तत्कालिन बी.एस.ई.एस. लि. व सध्याची मे रिलायन्स एनर्जी लि. या कंपनीच्या धोरणानुसार मुंबई महानगर पालिकेच्या धर्तीवर मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात पथदीवे देखिल सदर कंपनी मार्फत स्वखर्चाने बसविण्यात येतात. महानगरपालिकेमार्फत प्रत्यक्षात होणारे वीज बील व निश्चित केलेले देखभाल व दुरुस्तीची रक्कम दर महिन्यास देण्यात येते. अशा प्रकारे मुंबई महानगरपालिकेने निश्चित केलेल्या वीज वापर दर, देखभाल दुरुस्तीचे दर व All in hire scheme नुसार या शहरास मागील ३५ वर्षापासून वीज पूरवठा व पथदीवे बसविणे कार्यवाही करण्यात येत आहे. मे. रिलायन्स एनर्जी लि. सदर पथदीव्यांच्या देयकाच्या बदल्यात शहरातील त्यांच्या सर्व वाहीन्या स्थलांतरणाची कामे मोफत करते सार्वजनिक रस्त्यावर स्वखर्चाने तातडीने दिवे लावून देते.

सद्यस्थितीत केंद्र शासन व राज्य शासनामार्फत उर्जा बचतीचे धोरण असल्याने सद्यास्थितीत वापरत असलेल्या सोडीयम व्हेपर व मर्क्युरी व्हेपर चे दिवे एल.ई.डी. ने बदल्यास सुमारे ४०% उर्जेची बचत होऊ शकणार आहे. या साठी सदर दिवे बदलण्याची आवश्यकता आहे. तथापी सर्व पथदिवे यांची मालकी मे.

रिलायन्स एनर्जी लि. यांची असल्याने याबाबत त्यांच्याशी वेळोवेळी चर्चा करुन एल.ई.डी. दिवे करण्यासाठी त्यांनी खालील प्रमाणे मुंबई महानगर पालिकेच्या धर्तीवर प्रस्ताव सादर केला आहे.

| ALL IN HIRE Charges for LED Lanterns w.e.f.01/04/2017 up to 31/03/2020 | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No. | Existing HPSV Wattage | LED Wattage | Qty. Nos. (Nov. Bill) | HPSV AIH charges Rs. Each | LED AIH Charges Rs. Each | Effect on load (kw) | Increase in AIH (Rs. Lacs) p.a. | Reduction Energy Charges Rs. Lacs p.a. | Net Effect (Rs. Lacs)p.a |
| 1 | 70 | 50 | 6958 | 835 | 1070.00 | -244 | 16 | -77 | -60 |
| 2 | 150 | 105 | 4919 | 910 | 1185.00 | -334 | 14 | -105 | -92 |
| 3 | 250 | 170 | 1194 | 860 | 1175.00 | -134 | 4 | -42 | -38 |
| 4 | 400 | 445 | 303 | 840 | 840 | 0 | 0 | 0 | 0 |
| | | | 13374 | | | -712 | 34 | -224 | -190 |

वरील प्रमाणे मे. रिलायन्स एनर्जी लि. यांनी एल.ई.डी. दिवे बदलल्यास आकारण्यात येणारे सुधारीत दर दिले असून त्यानूसार वार्षिक रु.१.९० कोटी एवढा जास्त खर्च येणार असून त्याबदल्यास वार्षिक रु.२.२४ कोटी एवढी वीज वापराच्या खर्चात बचत होणार आहे. मुंबई महानगरपालिकेने मे. रिलायन्स एनर्जी लि., बी.ई.एस.टी व मे. महावितरण यांचा प्रस्ताव करुन मान्य करुन अंमलबजावणीची तयारी केली आहे. मिरा भाईंदर महानगरपालिकेने सदर प्रस्ताव मान्य केल्यास मे. रिलायन्स एनर्जी लि. मार्फत टप्प्याटप्प्याने दिवे बदलून एल.ई.डी. चे करण्यात येतील.

शासन नगरविकास विभाग यांच्या दि. १२ जानेवारी २०१८ रोजीच्या शासन निर्णयानूसार सर्व नागरी स्वराज्य संस्थाना पथदिव्यांसाठी फक्त एल.ई.डी दिवे बसविणे बंधनकारक करण्यात आलेले आहे. सर्व नागरी स्वराज्य संस्थाच्या क्षेत्रातील रस्त्यावरील प्रकाश व्यवस्थे करीता (पथदिवे) एल.ई.डी. दिव्यांचा वापर करुन उर्जा संवर्धन करण्यासाठी ई.ई.एस.एल (EESL) या केंद्र शासनाच्या सार्वजनिक उपक्रमाशी करारनामा (MOU) करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील पथदीवे एल.ई.डी. करण्याबाबत विविध खाजगी संस्थानी संपर्क करुन सादरीकरण केलेले आहे. त्या नूसार सदर संस्थामार्फत सर्व पथदीवे ताब्यात घेऊन स्वखर्चाने

दिवे बदलणे व वीज वापरात बचत होणाऱ्या रकमेतून महानगरपालिकेस उत्पन्न देणेची तयारी दर्शविलेली आहे. काही संस्थानी त्यांना एल ई डी करण्यासाठी रक्कम देण्याची मागणी केली आहे. तत्पूर्वी मे. रिलायन्स एनर्जी लि. यांना त्यांच्या पथदिव्यांचे मुल्यांकन करुन रक्कम अदा करावी लागेल. सदर रक्कम देखिल अदा करण्यास काही संस्थांनी तयारी दर्शविलेली आहे. या सर्व प्रस्तावाबाबत जाहीर निविदा काढून प्रस्ताव मागवून मे. रिलायन्स एनर्जी लि. यांच्या कडील सध्याची योजना व होणारे फायदे व देखभाल दुरुस्तीचे स्वरुन पाहता तसेच महानगरपालिकेस अतिरिक्त कोणताही खर्च, दायित्व व पथदिव्यांच्या सोयी सुविधात कमतरता न येता महानगरपालिकेच्या फायदयाचा प्रस्ताव स्विकारणे योग्य होणार आहे.

सद्यस्थितीत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात मे. रिलायन्स एनर्जी लि. यांचे १३३४७ पथदीवे व महानगरपालिकेने स्वतः बसविलेले २३६३ पथदीवे वापरात आहेत.

वरील प्रस्तावाबाबत विचार विनिमय होऊन महानगरपालिका क्षेत्रातील एल.ई.डी. पथदीवे बसविणे कामी प्रस्तावाप्रमाणे कार्यवाही करुन धोरण निश्चित होणेस शिफारस आहे.

**आयुक्त**
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-6/JP/18-19/PJ/MG-1